
दैनिक **अक्षराज** — अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध — Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : १०३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056










# भटक्या श्वानांना निवारा केंद्रांत सोडा; राज्य सरकारचे सर्व महापालिकांना निर्देश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बस स्थानके आणि रेल्वे स्थानकांसारख्या ठिकाणी आढळणाऱ्या भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करून त्यांना निवारा केंद्रात पाठवा, असे निर्देश राज्य सरकारने सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना सोमवारी दिले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही राज्य सरकारने दिला आहे.



भटक्या श्वानांबाबत सर्वोच्च न्यायालयात ३ नोव्हेंबरला झालेल्या सुनावणीला राज्याचे मुख्य सचिवही उपस्थित होते. त्यात न्यायालयाने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने भटक्या श्वानांबाबत राज्य सरकारने सोमवारी अनेक निर्देश दिले. भटक्या श्वानांना पकडण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर परिसरातील श्वानांना खाऊ घालण्यासाठी जागा निश्चित करण्यात याव्यात आणि त्याच जागांवर त्यांना खायला देण्यात येत असल्याची खातरजमा करावी, इतर मोकळ्या ठिकाणी खायला देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देशही राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

**वर्ष – राज्यातील भटके श्वान**
२०१२ – १२,१६,००३
२०१९ – १२,७६,३९९
२२,५९२ – यंदा पुणे जिल्ह्यात भटक्या श्वानांनी चावा घेतलेले
८८,००० – २०२२ ते सप्टेंबर २०२५ या काळात श्वानदंश झालेले
सुमारे १,७९,००० – पुण्यातील भटक्या श्वानांची संख्या.

भटक्या श्वानांबाबतच्या तक्रारींचे लवकरात लवकर निवारण करावे, सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारावे, राज्यातील सार्वजनिक रुग्णालयांनी नेहमीच 'अ‍ॅन्टी रेबीज' लशींचा साठा ठेवावा, अशा सूचनाही सरकारने केल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व महापालिका, नगर परिषदा, नगरपंचायती यांच्यात समन्वय साधण्यासाठी नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**• सूचना काय ?**

–भटक्या श्वानांबाबतच्या तक्रारींसाठी हेल्पलाइन क्रमांक जारी करावा.

–भटक्या श्वानांना निवारा केंद्रात पाठवल्यानंतर त्यांना पुन्हा त्यांच्या मूळ ठिकाणी सोडू नये.

–या श्वानांना खाऊ घालण्यासाठी जागा निश्चित कराव्यात. इतर ठिकाणी खायला देणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ७५१ कुंड यज्ञशाळा प्रवेश सोहळा
## भगवान शिव मूर्तिचे पूजन व उद्घाटन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, वेरुळ (छ. संभाजीनगर) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज संत जनार्दनस्वामी यांच्या वेरुळ येथील आश्रमात ॐ जगद्गुरू जनशांती धर्म या सोहळ्याला भेट दिली. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ७५१ कुंड यज्ञशाळा प्रवेश सोहळा तसेच भगवान शिव मूर्तिचे पूजन व उद्घाटन करण्यात आले.समाजप्रबोधन व राष्ट्राच्या उभारणीत संतांचे मोठे योगदान आहे. संत शांतीगिरी महाराजांच्या अनुग्रहाने लाखो लोकांचे जीवन बदलले. देश प्रगतीपथावर नेण्याचे सामर्थ्य संतांच्या मार्गदर्शनात आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. यावेळी संत शांतीगिरी महाराज, आमदार संजय केणेकर, आमदार प्रशांत बंब, सुरेश चव्हाणके आदी उपस्थित होते. संत नागेश्वरानंद आणि संत अवीमुक्तेश्वरानंद स्वामी यांनी फडणवीस यांचे स्वागत केले.

# लातूरमध्ये काँग्रेसला मोठं खिंडार !
# अमित देशमुख यांच्या जवळच्या नेत्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, लातूर :** राज्यात येत्या ०२ डिसेंबरला नगर पंचायत आणि नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. तर नंतर महत्त्वाच्या शहरांच्या महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. लातूर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज एक महत्त्वाची राजकीय घडामोड समोर आली आहे. लातूरचे माजी महापौर आणि काँग्रेसचे सक्रिय युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे विक्रांत गोजमगुंडे यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात गोजमगुंडे यांनी पक्षप्रवेश केला. गोजमगुंडे यांनी २०१९ ते २०२२ या कार्यकाळात लातूर महानगरपालिकेचे महापौर म्हणून काम पाहिले आहे. काँग्रेसचे माजी मंत्री आणि आमदार अमित देशमुख यांचे ते अत्यंत जवळचे सहकारी म्हणून ओळखले जातात. विक्रांत गोजमगुंडे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश हा अमित देशमुखांसाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

### अमित देशमुख यांना मोठा धक्का!

एकेकाळी अमित देशमुख यांचे खंदे समर्थक म्हणून विक्रांत गोजमगुंडे यांची ओळख होती. मात्र आज माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने लातूर मधील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाला आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये याचा फटका नक्कीच काँग्रेसला बसणार अशी चर्चा लातूरमध्ये होत आहे.

### विधानसभा निवडणुकीपासून नाराज

विधानसभा निवडणुकीमध्ये विक्रांत गोजमगुंडे यांच्यावर पक्षाने लातूर शहरात त्यांचे अस्तित्व असताना सुद्धा जाणीवपूर्वक अहमदपूरला पाठवले. यामुळे विक्रांत गोजमगुंडे नाराज असल्याच्या चर्चा त्यावेळी रंगल्या होत्या. अमित देशमुख यांनी जाणीवपूर्वक त्यांना लातूर पासून लांब ठेवल्याच्या चर्चा होत आहेत. विक्रांत गोजमगुंडे यांच्या जाण्यामुळे लातूर महानगरपालिकेत काँग्रेसला त्याची किंमत मोजावी लागेल, असे सांगितले जात आहे. आगामी निवडणुकीमध्ये खरंच काँग्रेसला याचा फटका बसेल का किंवा नाही? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. लातूर मधील अनेक जाणकारांनी विक्रांत गोजमगुंडे यांच्या पक्ष प्रवेशामुळे काँग्रेसला नक्कीच याचे नुकसान होईल असे मत व्यक्त केले आहे.



# ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड
# दिव्यातील प्रवासांची होते गैरसोय...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे प्रवाशांनी भरगच्च भरलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या टी.एम.टी.नवी मुंबईच्या एन.एम.एम. टी.बसेसची नेहमीच वर्दळ पहायला मिळते.

मात्र, जिथे टी. एम.टी. बसचे थांबे आहेत त्या ठिकाणी प्रवाशांना ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशी गैरसोय पहायला मिळत आहे. त्यामुळे विशेषतः विद्यार्थी, गरोदर महिला, आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पहायला मिळत असून, संबंधित ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने शिळफाटा जंक्शन नाक्यापासून ते दिव्यापर्यंत प्रमुख मार्गांवर हक्काचे शेडसह बस थांबे उभे करावे, अशी आग्रही मागणी होत आहे. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी बस थांब्याजवळ खासगी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा गराडा पहायला मिळतो. त्यामुळे, नाइलाजस्तव आलेल्या बसेस भर रस्त्यावर उभ्या राहत असल्याने, त्यातून मार्ग काढत प्रवाशांना बसमध्ये चढताना तारेवरची कसरत करावी लागते.

दरम्यान, प्रवाशांचा चांगला प्रतिसाद ठाणे महानगरपालिकेच्या टी. एम.टी,नवी मुंबई महानगरपालिकाच्या एन.एम.एम.टी.मिळत असूनही, मूलभूत सोयी–सुविधांअभावी प्रवासी वंचित रहात असल्याचे वास्तव परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी,सार्वजनिक वाहतूक सक्षम केली पाहिजे, असे मत अनेक संस्था, संघटनांनी व्यक्त केले होते.त्यामुळे, ठाणे आणि नवी मुंबई कडून येणाऱ्या टी.एम.टी.आणि एन.एम.एम.टी.बसच्या



फेऱ्यासुद्धा वाढविण्यात आल्या.त्यास, नागरिकांनी सुद्धा चांगला प्रतिसाद दिला.दिवसभर,दिवा परिसरातील सर्वच बसेस प्रवाशांनी तुडुंब भरून असतात.मात्र, ज्या ठिकाणी बसेस थांबतात त्या ठिकाणी,अधिकृत बस थांबा क्वचित निदर्शनास पडतो. अन्यथा जागोजागी नागरिक घोळका करून भर रस्त्यावर बसची वाट पाहत उभे असतात.

शिळफाटा जंक्शन नाका,खार्डीगांव, दिवा प्रभाग समिती सह परिसरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला उत्तम प्रतिसाद देत असूनही, प्रवाशांना मात्र ना हक्काचा बस थांबा, ना आश्रयासाठी शेड अशा गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. याकडे, ठाणे महानगरपालिका परिवहन प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

दिवा शहरातील मुख्य चौकात बस थांबा शेड नाही. त्यात, खासगी वाहनेसुद्धा पार्क होत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. कोविडच्या कालापासून या बसेस चालू झाल्या आहेत.४ ते ५ वर्षे होऊन सुद्धा दिव्यातील प्रवासांना सुख सुविधा मिळत नसल्याचे दिसून येत आहे.आता तरी प्रशासन जागे होऊन नागरिकांना दिलासा देणार का याकडे सर्व दिव्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नारळ-कुंकू-भोपळ्यांनी महाड शहर हादरले...
# निवडणुकीत अघोरी कृत्यांचा सुळसुळाट!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, रायगड :** महाड नगर परिषदेची निवडणूक तापली असतानाच शहरात अघोरी कृत्यांचा सुळसुळाट सुरू झाल्याने महाड हादरून गेलं आहे. विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर चर्चेत आलेले ओम फट स्वाहा प्रकरण पुन्हा एकदा निवडणूक रणधुमाळीत डोकं वर काढत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं सावट पसरलं आहे. २ डिसेंबरच्या मतदानाच्या आधी ही घटना घडल्याने राजकीय वातावरण अधिकच तंग झालं आहे. चवदार तळे परिसरातील रहिवाशांनी पहाटे रस्त्यावर विचित्र आणि संशयास्पद वस्तू पाहिल्या. फोडलेला नारळ, लाल कुंकू, तांत्रिक चिन्हं, काळी बाहुली आणि लाल भोपळा! ही रचना पाहता हा अघोरी विधी असल्याचा संशय बळावला. विशेष म्हणजे, हे सर्व साहित्य नेमकं ट्युलिप इमारतीसमोरच ठेवलेलं होतं, ज्यामुळे नागरिकांचा संशय अधिकच गहिरा झाला. सकाळी बाहेर पडलो तर रस्त्यावर लाल कुंकूने व्यापलेलं होतं. भोपळा, नारळ, बाहुली हे पाहून अंगावर शहारा आला, असे एका प्रत्यक्षदर्शी रहिवाशाने



सांगितले. परिसरात काही काळ भीतीमुळे शांतता पसरली; नंतर मात्र नागरिकांमध्ये या घटनेबद्दल चर्चा, कयास आणि आरोप–प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली. स्थानिकांच्या मते, निवडणुका जवळ येतात की असे अघोरी प्रकार वाढतात. लोकांना मानसिकदृष्ट्या घाबरवण्याचा प्रयत्न चालू आहे. हे वातावरण गढूळ करण्याची योजना दिसते. राजकीय वर्तुळातही या घटनेने खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादी – भाजप गटाकडून निवडणूक आयोग आणि पोलिसांकडे तक्रार करण्याची तयारी सुरू आहे. अशा कृत्यांनी निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा गंभीर प्रयत्न केला जात आहे, असा आरोप करण्यात येत आहे. महाडमधील या प्रकाराने अन्य भागातील अलीकडील घटना पुन्हा चर्चेत आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी माथेरान आणि म्हसळा येथेही असेच अघोरी साहित्य रस्त्यांवर सापडले होते. रायगड विभागातील विविध फार्महाऊसवर ओम फट स्वाहाचे विधी गुपचूपपणे केल्याची चर्चा सुरू असून, काही बुवा–बाबा परिसरात फिरताना नागरिकांनी पाहिल्याची माहितीही पुढे आली आहे.

प्रशासन मात्र सावध मोडमध्ये असून, पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला आहे. शहरात सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे कामही सुरू झाले आहे. हे केवळ अघोरी कृत्य नाही, तर निवडणूक वातावरणावर परिणाम करण्याचा प्रयत्न असू शकतो, असे पोलीस सूत्रांनी नमूद केले. या सगळ्या प्रकारामुळे एक मोठा प्रश्न पुन्हा डोकं वर काढतो. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच आता नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतही 'ओम फट स्वाहा'चा खेळ सुरू होणार का? असा प्रश्न उपस्थित होतो. नागरिक तणावात आहेत, प्रशासन तपासात आहे आणि राजकारण तापलं आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अघोरी कृत्यांचा हा अनपेक्षित उद्रेक महाडसाठी नक्कीच धोक्याची घंटा आहे.




## नेपाळी तरुणांना हवे तरी काय?

सप्टेंबर महिन्यात नेपाळमध्ये तरुणाई रस्त्यांवर उतरली. जगभरातल्या माध्यमांनी याची दखल घेतली. या आंदोलनाने सरकारवर दबाव वाढला. पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्यावर पायउतार होण्याची वेळ आली. हे आंदोलन यशस्वी झाले, अशी सर्वसाधारण भावना जगभर पसरली.

नेपाळमध्ये 'क्रांती' झाली आणि एकविसाव्या शतकात जन्मलेल्या म्हणजेच ज्यांना 'जनरेशन झी' किंवा 'जेन झी' म्हटले जाते, या पिढीने ही क्रांती आणली, ही भावना प्रस्थापित झाली. नेपाळने एका नव्या पहाटेच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, ही भावना नेपाळमधीलच नव्हे, तर दक्षिण आशियासह जगभरातील तरुणांना आशादायी वाटली.

पण, यानंतर केवळ दोनच महिन्यांनी नेपाळमध्ये पुन्हा हिंसाचार सुरू झाला आहे. माजी पंतप्रधान ओली यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ – युनिफाइड मार्क्सिस्ट लेनिनिस्टचे समर्थक आणि नेपाळी तरुण यांच्यात बारा नामक जिल्ह्यातील सिमारा गावात तणाव निर्माण झाला. या तणावाचं परिवर्तन हिंसाचारात झाले. हा हिंसाचार आजूबाजूच्या भागांमध्ये पसरला. शेवटी पोलिसांना जमावबंदी लागू करावी लागली.

ऑगस्ट महिन्यात नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारने लागू केलेल्या सोशल मीडियावरील बंदीमुळे नेपाळी तरुणाईत रोष निर्माण झाला आणि आंदोलनाला सुरुवात झाली. पण, ते तत्कालीन कारण मानले तरी हेच एकमेव कारणनाही. नेपाळच्या राजघराण्यातील हत्याकांडानंतर देशाने लोकशाही प्रजासत्ताकाच्या दिशेने प्रवास सुरू केला. भारतासारखा शेजारी देश नेपाळसाठी आदर्श असणे स्वाभाविक होते. यातून साहजिकच नेपाळी लोकांच्या अपेक्षा वाढल्या. पण, नेपाळच्या लोकशाही व्यवस्थेने कधीच स्थैर्य अनुभवले नाही. गेल्या दोन दशकांत नेपाळने जवळपास पंधरा वेळा पंतप्रधान आणि पर्यायाने सरकार बदलताना पाहिले. यात केवळ शांतातातमय सत्तांतरच नाही, तर मोठ्या प्रमाणात हिंसाचारसुद्धा पाहिला.

याची झळ नेपाळच्या अर्थव्यवस्थेला बसली नसती तरच नवल. यातूनच हळूहळू लोकांचा लोकशाही व्यवस्थेवरचा विश्वास कमी होऊ लागला. कोव्हिड महासंसर्गापासून नेपाळच्या पर्यटनाला आघात झेलावे लागले. याचा थेट परिणाम नेपाळच्या आर्थिक गणितांवर झाला. पण हे होत असताना नेपाळमधील राजकीय वर्गाची मात्र भरभराट होऊ लागली. लोकशाही हा लोककल्याणाचा मार्ग नसून केवळ राजकीय नेत्यांच्या समृद्धीचा मार्ग असावा, असे चित्र तयार झाले.

## बॉलिवूडचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड...

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध आणि यशस्वी अभिनेते, माजी खासदार धर्मेंद्र देओल याचं नुकतेच वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. बॉलिवूड मधिल हि मॅन म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांनी ६५ वर्षांची कारकिर्द गाजवली त्यांना 'शोले' चित्रपटातील 'वीरू'च्या भूमिकेसाठी विशेष ओळख मिळाली. १९७० आणि १९८० च्या दशकात ॲक्शन, रोमान्स आणि कॉमेडी यांसारख्या विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील नसराली येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव धर्मेंद्र केवल कृष्ण देओल होते. त्यांनी १९६० मध्ये अभिनयाला सुरुवात केली. त्यांनी शोले', 'सीता और गीता', 'चुपके चुपके' मेरा गाव मेरा देश, नोकर बीवी का, फुल और पत्थर, बेताब, यादों कि बारात, 'धर्मवीर' यांसारख्या ३०० हुन अधिक चित्रपटांमध्ये काम केले. २०१२ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरवण्यात आले होते. धर्मेंद्र यांचा जन्म सर्वसामान्य पंजाबी जाट कुटुंबात झाला लुधूनियातील लालटन कलान येथील सरकारी वरिष्ठ माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले होते त्यांचे वडील गावातील शाळेचे मुख्याध्यापक होते. एका सामान्य घरातील ग्रामीण भागातील या कलाकाराने आपल्या कर्तुत्वाने आणि अभिनयाच्या बळावर भारतीय सिनेसृष्टीवर सहा दशकाहून अधिक काळ राज्य केले. त्यांच्या या कलाविश्वातील कामगिरीने अनेक कलाकारांना दिशा मिळाली आहे. भारतीय सिनेसृष्टीतील तगड्या आणि उमद्या कलाकाराच्या निधनाने त्यांच्या चाहत्यांसह संपूर्ण कलाविश्व पोरके झाले आहे. धर्मेंद्र देओल यांना विनम्र आदरांजली....!

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

# संविधान धोक्यात आले तर देशाचा विनाश अटळ

दोन वर्षे ११ महिने १७ दिवसांत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन तसेच अठरा-अठरा तास अभ्यास, चिंतन व मनन करून भारतीय संविधान लिहून हजारो वर्षापासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले. भारतीय संविधान अस्तित्वात येण्याच्या अगोदर देशात हुकूमशाहीचा बोलबाला होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीत आपल्याला त्यांच्या इशाऱ्यावर चालावे लागायचे. जेव्हा देशात मनुस्मृती अस्तित्वात होती, तेव्हा येथील शूद्र व अतिशूद्र प्रवर्गातील लोकांना अतिशय हिन व नीच दर्जाची वागणूक दिली जात होती. मनुस्मृतीनुसार या देशाचा राज्यकारभार चालत असताना, मनुस्मृतीने येथील अस्पृश्यांना व शूद्रांना सर्व मूलभूत हक्क व अधिकार नाकारून त्यांच्यावर कमालीचा अन्याय, अत्याचार केला होता. त्यांना अतिशय अमानुषपणे वागणूक देऊन त्यांना जनावरासारखे वागवले जायचे. सार्वजनिक ठिकाणी पाणवठ्यावर शूद्रांना व मागासवर्गीयांना पाणी पिण्याची मुभा नव्हती. येथील मनुवादी व्यवस्थेनुसार त्यांना वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागायचे. उच्चवर्णीय लोक त्यांना गुलामासारखे वागवायचे आणि त्यांचा अमानुषपणे छळ करायचे. शाळा शिकत असताना बाबासाहेबांना जातीयतेचे विखारी चटके पदोपदी सहन करावे लागायचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संध्याकाळी दिव्याखाली बसून अभ्यास करायचे आणि दिवसा शाळेत गेल्यावर वर्गाच्या बाहेर बसून अभ्यास करायचे, शाळेतील मास्तर जे शिकवतील ते नीट ध्यान देऊन ऐकायचे आणि एकेक पावाचा तुकडा खाऊन अठरा-अठरा तास अभ्यास करायचे. त्यांना येथील मनुवादी व्यवस्थेची प्रचंड चिड होती. मनुवादी व्यवस्थेने येथील मागासवर्गीयांना जनावरांपेक्षा हीन दर्जाची वागणूक दिली होती. म्हणून बाबासाहेबांनी खूप खूप शिक्षण घेऊन सर्व जाती-धर्माचा सखोल अभ्यास करून आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला कारणीभूत असणाऱ्या मनस्मृतीला अगोदर रायगडाच्या पायथ्याशी जाळून छत्रपती शिवरायांच्या अपमानाचा बदला घेतला आणि भारतीय संविधान लिहून सर्व जाती धर्माला घटनेच्या माध्यमातून मूलभूत हक्क व अधिकार बहाल करून दिले. हजारो वर्षापासून मागासवर्गीय




समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला मनुस्मृतीचे दहन करून व भारतीय संविधान लिहून पाय बंद घातला. माणसाला जनावराचे जीवन नाकारून माणसाचे जीवन बहाल केले. हजारो वर्षापासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला माणसात आणून सन्मानाने जीवन जगायला शिकवले. भारतीय संविधानाच्या माध्यमातून समस्त बहुजन समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व बहाल करून दिले. देश स्वतंत्र होऊन व देशात लोकशाही येऊन खूप वर्षे लोटली तरीसुद्धा देशात भारतीय संविधानानुसार देशाचा राज्यकारभार खरंच चालतो का? देशात बलात्कार करणाऱ्या नराधमांना संविधानानुसार कठोर शिक्षा मिळते का? देशात शेतकरी व शेतमजूर सुखी आहेत का? सरकार संविधानानुसार देशाचा राज्यकारभार करतो का? गोरगरीब शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या पाठीमागे सरकार खंबीरपणे उभे आहे का? भारतीय संविधान पुरुषांएवढेच महिलांना सुद्धा स्वातंत्र्य देते. पण देशात किती महिला सुरक्षित आहेत? किती महिलांना बाहेर फिरायचे स्वातंत्र्य आहे? स्वातंत्र्य असूनही जर महिलांना चूल आणि मूल इतक्या पुरतेच मर्यादित ठेवत असाल तर भारतीय संविधानाचा हा घोर अपमान झाल्यासारखा आहे. देशात बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. कालपरवा मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुरडीवर एका नराधमाने अमानुष व पाशवी अत्याचार करून तिला दगडाने ठेचून तिची अमानुष हत्या केली. ही लोकशाही प्रधान देशात लोकशाहीचा घोर अपमान करणारी फार मोठी धक्कादायक घटना आहे. शासन अशा नराधमाला वेळीच फाशीची कठोर शिक्षा देऊन पीडित मुलीला न्याय देऊन भारतीय संविधानाचा सन्मान का वाढवत नाही? असे अन्याय, अत्याचार देशात रोज कुठे ना कुठेतरी घडतच आहेत. परंतु आरोपीला शिक्षा मात्र होत नाही. शासन लाच घेऊन व मूग गिळून गप्प बसत आहे. आरोपी मात्र मोकाट फिरत आहेत परंतु पीडित मुलींना व महिलांना न्याय मिळत नाही. शेतकरी आत्महत्या रोज कुठे ना कुठेतरी होतच आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळत नाही. शेतकऱ्यांच्या डोक्यावर असणारा कर्जाचा भार शासन काही कमी करत नाही. आर्थिक संकटात व अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय देणे हे शासन कर्तव्य आहे परंतु शासन शेतकऱ्यांना न्याय न देता शेतकऱ्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. हा भारतीय संविधानाचा एक प्रकारे अपमान ठरतो. महिलांना स्वातंत्र्य असून सुद्धा बऱ्याच घरातील पुरुष महिलांना आजही घराचा उंबरठा ओलांडू देत नाहीत. बरेच आई-वडील मुलींना उच्च शिक्षण शिकू देत नाहीत तसेच त्यांना मनावर लग्नासाठी वर शोधू देत नाहीत. राजकीय क्षेत्रात बरेच राजकारणी घोटाळे व भ्रष्टाचार करण्यात माहीर असतात. मोठमोठे घोटाळे व भ्रष्टाचार करून देखील शासन अशा घोटाळेबाज व भ्रष्टाचारी राजकारणी लोकांना कोणतीच शिक्षा देत नाही. म्हणजे शासन एक प्रकारे संविधानाचा अपमान करत आहे, असेच म्हणावे लागेल. शासन गोरगरिबांना न्याय न देता श्रीमंतांच्या बाजूने उभे राहत आहे. मोठमोठे लोक लाच देऊन आपले गुन्हे माफ करतात. परंतु गोरगरिबांना शासन न्याय देण्यात कुठेतरी कमी पडत आहे. अनेक गोरगरिबांना न्याय मिळत नाही. जो आरोपी शासनाची तिजोरी भरतो त्याला शासन माफ करत आहे. देशात असे कित्येक गोरगरीब लोक आहेत जे की, न्यायासाठी बेजार आहेत. तरीसुद्धा त्यांना शासन दरबारी न्याय मिळत नाही. हा संविधानाचा घोर अपमान होत आहे. खूप वर्षे झाली पण अजूनही डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली नाही. आतापर्यंत कित्येक मुलींवर व महिलांवर बलात्कार झाले आहेत, तरीसुद्धा बलात्कारी मोकाट फिरत आहेत, पण पिडीतांना न्याय मिळत नाही. त्यांना शासन पाठीशी घालून त्यांचे समर्थन करत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते संविधान कितीही चांगले असून काही फायदा नाही. ते चालवणारे सरकार किती चांगले आहे? यावरून त्याचे चांगले वाईट पण अवलंबून असते. कारण सरकार जर चांगले असेल तर त्या संविधानाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होते. परंतु आजकालचे सरकार भारतीय संविधानाला न्याय देण्यात कुचकामी व निष्क्रिय ठरत आहेत. भारतीय संविधानानुसार न्याय न देता देशात एक प्रकारची हुकुमशाही आणत आहेत. यामुळे लोकशाही धोक्यात येत आहे. लोकशाही धोक्यात आली आणि या देशाचा कारभार जर संविधानानुसार योग्य पद्धतीने होत नसेल तर हा देश पुन्हा एकदा हुकूमशाहीच्या वाटेवर असेल. देशात हुकूमशाही आली आणि संविधान धोक्यात आले तर हा देश सुद्धा धोक्यात येऊ शकतो आणि तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असू शकतो. लोकांच्या भावनांचा अतिरेक होऊन देशात तिसरे महायुद्ध झाले तर देशात रक्तरंजित रणधुमाळी झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून शासनाने कायदेशीर मार्गाने देशाचा कारभार चालवून या देशातील जेवढे मोठे गुन्हेगार व आरोपी आहेत त्यांना कठोरात कठोर फाशीची शिक्षा देऊन पिडितांना न्याय द्यावा आणि भारतीय संविधानाचा सन्मान वाढवावा, नाहीतर एकदिवस भारतीय संविधान धोक्यात आले तर मग मात्र देशाचा विनाश अटळ आहे. हेच भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने माझे सांगणे आहे. भारतीय संविधान दिनाच्या सर्व भारतीयांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## संविधान महत्व

संविधान हा राष्ट्रग्रंथ
रे प्रजासत्ताकभारता
महत्व सत्वतत्व कळे
मनाअसावी गंभीरता

महत प्रयासे लिहिली
संविधानाची संहिता
योगदान भीमरावांचे
सार्थ कथा जन हिता

वैश्विक मूल्य जाणावे
न्याय स्वातंत्र्य समता
संविधान हेचं सांगते
जपे सार्वभौम बंधुता

जात धर्म न् वंश लिंग
प्रांत भाषा विविधता
विसरू सर्व भेद भाव
अखंड रहावी एकता

उत्तरदायित्व सर्वांचेच
प्रत्यक्षा येवो सिध्दता
समस्तजन रक्षणकर्ता
नितिमूल्य कटिबध्दता

संविधानाचा केंद्र बिंदू
व्यक्ती अन् नितीमत्ता
हा विकासजाहिरनामा
अंमलात सर्वां करिता

जिम्मेदारी खरी त्यांची
ज्याचेहाती असे सत्ता
समस्त जन साथ हवी
वाढे संविधान महानता

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# संविधान ; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## हिवरे बाजारमध्ये धर्मध्वजाचे पूजन; रामराज्याच्या संकल्पाची पुनः निश्चिति



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** श्री क्षेत्र अयोध्या येथील श्रीराम मंदिराचा कलश पूर्ण होऊन एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे आज दुपारी १२.१० वाजता शुभमुहूर्तावर धर्मध्वजाचे पूजन करण्यात आले. दि.२२ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या श्रीराममूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास जगातील निवडक ८ हजार मान्यवरांना निमंत्रण देण्यात आले होते. त्यात हिवरे बाजारचे ग्रामविकासाचे शिल्पकार पद्मश्री पोपटराव पवार यांना विशेष निमंत्रणाचा मान मिळाला होता. श्रीराम न्यास, अयोध्या कडून जगातील निवडक ३०० भाग्यवंतांना श्रीरामलल्लाच्या मूर्तीच्या निर्मितीमध्ये वापरलेल्या पवित्र शिलांशांचे वितरण करण्यात आले. त्यापैकी एक पवित्र शिलांश हिवरे बाजारला प्राप्त झाला असून, अखंड हरीनाम सप्ताहाच्या मुहूर्तावर त्याची श्रीराम मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.गावाने साकारलेल्या सर्वसमावेशक विकासाच्या रामराज्याला ही घटना प्रतीकात्मक सलाम असल्याचे मानले जात आहे.

या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकर्ते रविंद्र मुळे, विभाग संपर्क कार्यकर्ते घनश्याम डोडीया व सचिन सोमवंशी यांनी पद्मश्री पवार यांना निमंत्रण व शिलांश प्रदान करणारे तेच मान्यवर आजच्या पूजन सोहळ्यातही सहभागी झाले. यावेळी बोलताना घनश्याम डोडीया म्हणाले,धर्मध्वज पूजनाच्या या पवित्र प्रसंगी हिवरे बाजारला भेट देणाऱ्या पर्यटकांनी एक संकल्प केला पाहिजे. देशभरात हिवरे बाजारसारखी अनेक ग्रामराज्ये निर्माण करण्याची प्रेरणा घेण्याचामंदिरात ठेवलेला हा शिलाखंड हे हिवरे बाजारच्या रामराज्याचे जिवंत प्रतीक आहे. हिवरे बाजारच्या आदर्श ग्रामविकास परंपरेत आजचा हा पूजन सोहळा आणखी एक प्रेरणादायी अध्याय ठरला.

## काँग्रेसच्या माजी शहराध्यक्ष बंडेवार यांचा आ.जोरगेवार यांच्या उपस्थितीत भाजपात जाहीर प्रवेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, घुग्घुस (चंद्रपूर) :** घुग्घुसच्या काँग्रेसच्या माजी शहराध्यक्ष विजया बंडेवार तसेच उबाठाचे उपतालुका प्रमुख गणेश शेंडे यांनी मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यकर्त्यांसह आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत घुग्घुस येथे भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे भाजपाला स्थानिक पातळीवर अधिक बळकटी मिळणार आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी या दोन्ही नवनियुक्त सदस्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांची उपस्थिती होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्व आणि राज्याचे नेतृत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकुशल, पारदर्शक व जनहितैषी कामकाजावर विश्वास ठेवून काँग्रेसच्या माजी शहराध्यक्ष विजया बंडेवार, काँग्रेस नेते अशोक बंडेवार आणि गणेश शेंडे यांनी भाजपाचा विचार स्वीकारला आहे. यावेळी नवनियुक्त सदस्यांचे पक्षात स्वागत करताना आ.किशोर जोरगेवार म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा राष्ट्रहित, विकास आणि सर्वसमावेशक प्रगतीचा मार्ग स्वीकारणारा पक्ष आहे. आज विजया बंडेवार आणि गणेश शेंडे यांनी आमच्या पक्षावर ठेवलेला विश्वास हा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या अनुभवामुळे आणि नेतृत्वामुळे संघटना अधिक बळकट होईल आणि घुग्घूसमध्ये विकासाची नवी ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास आहे. पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे योगदान मौल्यवान असून त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. विकासाच्या प्रवासात आम्ही एकजुटीने काम करत राहू आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध राहू, असे यावेळी ते म्हणाले.

## दिव्याचा संकलन केलेला कचरा शिलफाटा परिसरात टाकायला सुरुवात

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** दिव्याचा डम्पिंग बंद झाला डायघरचा वीज प्रकल्प बंद झाला, भंडार्लीचा डम्पिंग बंद झाला आता शिळ फाटा येथे आरोग्य केंद्र, पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या विभागाच्या बाजूला कचरा टाकण्याचा काम चालू आहे. ठाणे आयुक्त नागरिकांच्या जीवाशी खेळतो आहे का? गेल्या काही दिवसापासून डायघर डम्पिंग ग्राउंड बंद असल्यामुळे ठाणे शहरामध्ये विविध ठिकाणी कचऱ्याचे ढीग जमा झालेले आहेत. दिवा शहरात ही मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. आता गेल्या तीन दिवसापासून वनविभागाच्या जमिनीमध्ये बुलेट ट्रेनच्या बाजूला कचरा टाकण्याचे काम केले जात आहे. या ठिकाणी कचरा टाकण्याला ग्रामस्थांनी विरोध केलेला आहे. त्याचबरोबर मनसेचे विभाग अध्यक्ष शरद पाटील यांनी ही या ठिकाणी कचरा टाकून ग्रामस्थांच्या आरोग्याला बाधा पोहोचवणाऱ्या महानगरपालिकेला चांगले सुनावलेला आहे. शिळ, डायघर आणि इथल्या या विभागांमध्ये असलेल्या गावांमध्ये ठाण्याचा कचरा आणून टाकून इथल्या गावाच्या ग्रामस्थांना त्रास देणाऱ्या ठाणे महानगरपालिकेचे त्यांनी निषेध केला आहे.

## संविधान प्रभातफेरीचे २६ नोव्हेंबर रोजी आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, नांदेड :** भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान शासन निर्णय परिपत्रक १८ नोव्हेंबर २०२५ नुसार २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व शासकीय विभागाचे कार्यालयात, महाविद्यालये, शाळा, वसतिगृहामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय विभागाचे कार्यालय, महाविद्यालय, शाळा, निवासी शाळा व मुला-मुलींचे शासकीय वसतिगृहामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी आदेशीत केले आहे. बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वा. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यापासुन शिवाजीनगर, कलामंदिर, मुथा चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत संविधान प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरहु संविधान प्रभातफेरीमध्ये सर्व नागरीकांनी सहभागी होण्याचे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केली आहे.

## चंद्रपूरमध्ये पुन्हा वाघाचा हल्ला; मानव-वन्यजीव संघर्षातील ४० वा बळी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूर वनपरिक्षेत्रात दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी वन्यप्राण्यांच्या हल्लयात ४० वा बळी गेला. दुर्गापुरातील पायली - भटाळी बीटात सरपण गोळा करण्यासाठी जंगलात गेलेल्या चिंचोली निवासी ५४ वर्षीय बाबा नारायण गेडाम याला दबा धरुन बसलेल्या वाघाने हल्ला चढवीत ठार केले.

चंद्रपूर जिल्ह्यात सुरु असलेल्या मानव - वन्यजीव संघर्षातील हा ४० वा बळी होता. आत्तापर्यंत वाघाच्या हल्लयात ३६, बिबट २, अस्वल व हत्तीच्या हल्लयात प्रत्येकी एक असे एकूण ४० जणांचा मृत्यू झाला आहे. चिंचोली गावात राहणारे ५४ वर्षीय बाबा गेडाम हे रोजंदारी मजूर म्हणून कामे करत होते. सध्या थंडीचे दिवस असल्याने दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० गेडाम हे सरपण गोळा करण्यासाठी गावातील झुडपी भागातील पायली-भटाळी बीटातील वन कक्ष क्रमांक ८०० मध्ये गेले होते. त्याठिकाणी दबा धरुन बसलेल्या वाघाने गेडाम यांच्यावर हल्ला करीत त्यांना जंगलाच्या दिशेने फरपटत घेऊन गेला.

गेडाम हे सायकलने जंगलाच्या दिशेने गेले होते. सायंकाळी गेडाम यांचे कुटुंब कामावरुन घरी परतले, मात्र वडील घरी न आल्याने कुटुंबाने शोधाशोध सुरु केली, मात्र, त्यांचा काही थांगपत्ता लागला नसल्याने गावातील नागरिकांना सोबत घेत जंगलाच्या दिशेने निघाले असता त्यांना गेडाम यांची सायकल व त्याठिकाणी रक्ताचे



डाग आढळून आले. याबाबत दुर्गापूर पोलिसांना व वनविभागाला नागरिकांनी माहिती दिली.

काही वेळात वनविभाग व पोलिसांळची चमू त्याठिकाणी दाखल झाली. गेडाम यांचा शोध घेण्यासाठी सर्वांनी जंगलाच्या दिशेने मोर्चा वळविला असता, गेडाम यांची कुऱ्हाड, व रक्ताने माखलेले कपडे आझळून आळे, तब्बल रात्री ११ वाजता गेडाम यांच्या मृतदेहाचे तुकडे, हाथ त्यानंतर छिन्न विछिन्न अवस्थेत त्यांचा मृतदेहाचा खाल्लेला भाग आढळून आला. गेडाम यांचा मृतदेह मिळाल्यावर नागरिकांचा वनविभागावर रोष उफाळून आला. रात्रीपासून गावात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. वाघाचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली.

## आज पिंपळगाव रोठा येथे चंपाषष्ठी महोत्सव

### कोरठण खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान ऋब 'वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या पिंपळगाव रोठा येथिल कोरठण खंडोबा देवस्थान गडावर चंपाषष्ठी महोत्सवाचे आयोजन दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले असून या चंपाषष्ठी निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा शालिनी घुले यांनी दिली. पहाटे ४ वाजता खंडोबा मंगलस्नानाने चंपाषष्ठी उत्सवाची सुरुवात होईल. त्यानंतर चांदीची सिंहासन पेटी आणि चांदीच्या उत्सव मूर्तींचे सिंहासनावर अनावर केली




जाईल. साज - शृंगारानंतर पूजा व महा आरती पार पडेल.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते दिपक लंके व जया लंके, पोलिस उपायुक्त गणेश इंगळे, शांताराम भालेराव, इंदुमती भालेराव आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते अभिषेक, पूजा व आरती होणार आहे. गोरेगाव येथून पायी आलेल्या दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यात येईल. सकाळी अकरा वाजता शब्दसाधक अविनाश भारती (घटनांदुरफर) यांचे कीर्तन होईल. दुपारी एक वाजता शाहीर विलास अटक व शाहीर नामदेव शिंदे यांच्या खंडोबाच्या गाण्यांचा स्पर्धेचे आयोजन केले आहे. दुपारी एकच्या दरम्यान खंडोबाच्या चांदीच्या पालखी आणि चांदीच्या उत्सव मूर्तींची नवीन शाही रथातून मंदिर प्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या दरम्यान सकाळी अकरा पासून भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाईल. मंदिर रंगकाम तसेच विविध विकासकामांसाठी भाविकांनी देणगी स्वरुपात सहकार्य करावे असे आवाहन ट्रस्टचे उपाध्यक्ष महेश शिरोळे, अशोक घुले, सचिव चंद्रभान ठुबे, खजिनदार कमलेश घुले, ॲड.पांडुरंग गायकवाड, भाऊसाहेब गाडगे, जालिंदर खोसे, सुवर्णा धाडगे, अजित महांडुळे, रामचंद्र मुळे, हरिभाऊ जगताप, सुरेश फापाळे, दिलिप घुले व तुकाराम जगताप यांनी केले आहे.

## वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यावर भर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** पर्यावरणाकडे विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने वायू प्रदूषणावर प्रतिबंध आणण्याकरिता बांधकाम साईट, दगड खाणी, सिमेंट निर्मितीचे आर.एम.सी प्लांट याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे व त्यासोबतच वाहनांमुळे होणारे प्रदूषण, तंदूर भट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण कमी होण्यासाठीही प्रयत्न करावेत असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे आणि विभाग प्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

थंडीमुळे व वायू प्रदूषणामुळे हवेतील धुरके (डचजत्र) वाढले असून ते कमी होण्यासाठी सतर्कता राखत ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची गरज विशद करीत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईट्सवर धूळ प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविल्या जात असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून खात्री करावी व त्यामध्ये त्रुटी आढळल्यास साईटवरील बांधकाम आठवड्याभरासाठी बंद करावे असे निर्देश दिले.

याकरिता नगररचना विभाग व विभाग कार्यालयातील अभियंत्यांनी आपापल्या क्षेत्रातील बांधकाम साईट्सवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व त्याचा अहवाल जलद सादर करावा असे निर्देशित केले. सध्या वारा वाहण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने हवेतील धुरके वाढले असून त्यावर नियंत्रणासाठी मुख्य रहदारीचे रस्ते व एमआयडीसी क्षेत्रातील रस्ते याठिकाणी रस्त्यांच्या कडेला असलेली माती वाहनांच्या वेगामुळे हवेत उडून धुळीचे प्रमाण वाढते हे लक्षात घेत ती साफ करावी व उचलून नेण्याची धडक मोहीम राबवावी असेही निर्देशित केले. अशाप्रकारे रस्त्यांच्या कडेची माती साफ करण्याची प्रक्रिया दर १५ दिवसांनी राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. कॉरी साईट्स व सिमेंट निर्मितीचे आरएमसी प्लांट याठिकाणीही प्रदूषण प्रतिबंधाचे नियम पाळले जात असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून खातरजमा करावी व अहवाल द्यावा असे आयुक्तांनी निर्देशित केले. अशाच प्रकारे बेकरीत कोळशाचा वापर होत असेल तर तो बंद करावा तसेच तंदूरसाठी हॉटेलमध्ये होणाऱ्या कोळशाच्या वापरासही प्रतिबंध करावा, त्याचप्रमाणे कुठे कचरा जाळला जात असेल तर त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी असे आयुक्तांनी सूचित केले.

दैनंदिन स्वच्छतेमध्ये गावठाणातील कचरा संकलनाकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे स्पष्ट करीत स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे गावठाणांच्या कार्यक्षेत्राची जबाबदारी सोपवून गावांच्या अंतर्गत भागातील कचरा संकलन कसे होईल याचे नियोजन करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. बायलेन स्वच्छतेकडेही विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. हा पानगळतीचा ऋतू असल्याने पानांचा कचराही गोळा केला जावा व तो कुठल्याही परिस्थितीत जाळला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे या हरित कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी उद्यानातील चारही कोपऱ्यात कंपोस्ट पीट असावेत असे आयुक्तांनी निर्देश दिले.

पर्यावरण संरक्षरणाच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे बनविण्यात आलेल्या गॅस शवदाहिनी व विद्युत शवदाहिनी वापरात आणून स्मशानभूम



ीत ही पर्यावरणपूरक संकल्पना राबवावे. त्यासाठी नागरिकांना प्रोत्साहीत करावे असे आयुक्तांनी सूचित केले. बेघर व फेरीवाले ही सुनियोजित शहराच्या दृष्टीने मोठी समस्या असून सातत्याने कारवाई करणे हाच प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकाम सुरु असलेल्या अनधिकृत इमारतींवर तोडक कारवाई प्रभावीपणे राबवावी तसेच विनापरवानगी बॅनर व पोस्टर्सवरही कायदेशीर कारवाई करावी असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. नमुंमपा सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार प्रारुप मतदार यादीबाबत आलेल्या हरकती व सूचना तपासण्याचे काम विहीत वेळेत बारकाईने करावे असे निर्देश देतानाच दुबार नावांबाबतची मोहीम अतिरिक्त मनुष्यबळ वापरून काळजीपूर्वक पूर्ण करावी असे आयुक्तांनी निर्देशित केले.

त्यासोबतच मतदान केंद्रांच्या जागांची पाहणी करावी व तेथील आवश्यक सेवा सुविधा पूर्ततेचे नियोजन करावे त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाकरिता निवडणूक केंद्राच्या संभाव्य जागांची पाहणी करुन त्या निश्चित कराव्यात व त्या जागा निवडणूक कामासाठी अधिग्रहीत करावयाच्या असल्याने त्या कौटुंबिक, सामाजिक उपक्रमांसाठी आरक्षित करता येणार नाहीत असे जाहीर करावे, जेणेकरुन नागरिकांना त्याबाबत माहिती मिळेल व त्यांना या जागा वगळून आपल्या कार्यक्रमांचे नियोजन करता येईल अशाही सूचना आयुक्तांनी दिल्या.नागरी सेवा सुविधांबाबत अभियांत्रिकी विभागाला स्पष्ट निर्देश देताना कामाची गरज लक्षात घेऊनच सुविधा काम प्रस्तावित करावे असे आयुक्तांनी सांगितले. त्याचप्रमाणे बांधकामाच्या दर्जाशी कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. विविध सेवा पुरविण्यासाठी रस्ते खोदले जातात.

या बाबीकडे गंभीर लक्ष देत नव्याने निर्मिती झालेला रस्ता कोणत्याही कारणासाठी खोदला जाणार नाही असे स्पष्ट करीत कोणत्याही कारणासाठी रस्ता खोदण्यासाठी आयुक्तांची परवानगी घ्यावी असेही त्यांनी सांगितले. खड्डेमुक्त रस्ते हे आपले प्राधान्याने लक्ष्य असून त्यादृष्टीने सुरु असलेल्या कामांना वेग दयावा आणि पुढील १५ दिवसांत हे काम पूर्ण करुन तसा अहवाल सादर करावा असे सर्व विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निर्देश देण्यात आले.

नवी मुंबईची पर्यावरण स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने प्राधान्याने वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याकडे काटेकोर लक्ष द्यावे असे निर्देशित करतानाच नागरिकांमध्येही पर्यावरणविषयक जागरुकता निर्माण करण्यासाठी तसेच त्यादृष्टीने काळजी घेण्यासाठी जनजागृती करण्याचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याकडून निर्देश देण्यात आले.

# धारेश्वर दिवशी मठातील चोरी प्रकरणी दोघांना अटक

## १ लाख ९९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण (सातारा) :** दिवशी खुर्द (धारेश्वर), ता. पाटण येथील घारेश्वर मठात गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास धारेश्वर महाराज यांची चांदीची पूजेची वापरातील भांडी व रोख ८ हजार असा एकूण १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून अज्ञात व्यक्ती पसार झाली होती. या प्रकरणी पाटण पोलिसांनी तपास करून चोवीस तासात शिवप्रसाद प्रवीण जंगम, वय २१, रा.भिकवडी खुर्द, ता. कडेगाव, जि.सांगली व गणेश सोमनाथ जंगम, वय २१, रा. भिकवडी खुर्द, ता. कडेगाव, जि.सांगली या दोन संशयित आरोपींना अटक केली आहे.

याबाबत पाटण पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, पाटण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजे दिवशी खुर्द येथे रा.पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास धारेश्वर महाराज रहात असलेल्या



गावातील मठाच्या पाठीमागील सिमेंटच्या दरवाजाची आतील बाजूची कडी काढून अज्ञात चोरट्यांनी मठात प्रवेश करून धारेश्वर महाराज यांची चांदीची पूजेची वापरातील भांडी व रोख रक्कम चोरून नेली होती.

याबाबत पाटण पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर तसेच पाटणचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकअविनाश कवठेकर व पथकाने तत्काळ तपास यंत्रणा राबविली. गोपनीय माहितीनुसार व तांत्रिक बाबीचा वापर करून कसोशीने शोध घेतला असता चोरीस गेलेला माल व चोरट्यांना पकडण्यात त्यांना यश आले.

या चोरीप्रकरणी शिवप्रसाद प्रवीण जंगम व गणेश सोमनाथ जंगम या दोघांना विश्वासात घेत चौकशी केली असता सदर गुन्हा दोघांनी संगनमत करून केल्याचे कबूल केले. त्यांच्याकडून एक चांदीचे प्रसाद पात्र, एक चांदीचा तांब्या, एक चांदीचे धारापात्र, एक चांदीचे फुलपात्र, एक चांदीचे निरंजन, एक चांदीचे पेलापात्र व ८ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती वैशाली कडूकर, पाटणचे उपविभागीय पोलीस अधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर, पोलीस हवालदार अमृत आळंदे, संतोष कुचेकर, पोलीस कॉन्स्टेबल उमेश मोरे यांनी केली.

# प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमांमध्ये नोव्हेंबर महिन्यात १.४० लाख दंडात्मक वसूली

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** प्लास्टिकमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला होत असलेला धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा याकरिता नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दुकाने व व्यवसायाच्या ठिकाणी प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबवून तपासणी करण्यात येत आहे. तपासणीमध्ये प्लास्टिक पिशव्या अथवा एकल वापर प्लास्टिक वस्तू आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. या अंतर्गत ऑक्टोबर महिन्यात ५ दुकाने, आस्थापनांवर कारवाई करित रु.२५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली असून ६,७०० किलो एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

या तपासणी मोहीमेंतर्गत नोव्हेंबर महिन्यातही २३ नोव्हेंबर पर्यंत २८ दुकाने, आस्थापना या ठिकाणी प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकचा उपयोग केला जात असल्याचे आढळल्याने एकूण १



लक्ष ४० हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ४६ किलो ६०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.यामध्ये परिमंडळ १ व परिमंडळ २ च्या भरारी पथकांनी विशेष कामगिरी केली असून प्रत्येकी ५ व्यावसायिकांवर कारवाई करीत प्रत्येकी २५ हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे. तसेच परिमंडळ १ च्या भरारी पथकाने ५ किलो व परिमंडळ २ च्या भरारी पथकाने ८ किलो प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक जप्त केले आहे. ऐरोली विभाग कार्यालयातील प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथकानेही ६ व्यावसायिकांकडून रु.३० हजार दंडात्मक रक्कम वसूल केली आहे व ८ किलो २५० ग्रॅम प्लास्टिक साहित्य जप्त केले आहे. इतर विभागांमध्येही चांगली कामगिरी झाली आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालयाचे विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे अधिनस्त प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथके तसेच दोन्ही परिमंडळाची भरारी पथके प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवायांसाठी सतत कार्यरत आहेत. प्लास्टिकमुळे मानवी जीवनाला व पर्यावरणाला पोहचणारा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी स्वत:हूनच प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णत: टाळावा व कापडी / कागदी पिशव्यांचा पर्याय निवडावा तसेच व्यावसायिकांनीही आपल्या वस्तू देण्यासाठी प्लास्टिक पिशव्या देऊ नयेत व प्लास्टिक पिशव्या दुकानात ठेवूच नयेत असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# नगर शहरात जानेवारीमध्ये सावित्री - ज्योती महोत्सवाचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** महिला बचत गटांसाठी पर्वणी ठरणारा सावित्री-ज्योती महोत्सव यावर्षीही उत्साहात पार पडणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यंदाही कोट्यावधीची उलाढाल अपेक्षित असून, बचत गटातील महिलांना त्यांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी हा महोत्सव एक महत्त्वाची बाजारपेठ उपलब्ध करून देणार आहे.

महोत्सवाचे भिंतीपत्रक नुकतेच अनावरण करण्यात आले. या महोत्सवाचे हे दहावे वर्ष असून, महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते. अहिल्यानगर महानगरपालिका, मेरा युवा भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय व जय युवा अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ते २८ जानेवारी दरम्यान कोहिनूर मंगल कार्यालय येथे राज्यस्तरीय सावित्री-ज्योती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

बैठकीत रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, राष्ट्रीय युवा सप्ताह, विविध स्पर्धा, बचत गटांच्या स्टॉलचे विक्री प्रदर्शन, ब्युटी टॅलेंट शो, मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर, लोककला सादरीकरण, सर्व जातीय वधू -वर मेळावा अशा विविध विषयांवर चर्चा झाली. महोत्सवाच्या नियोजन



बैठकीचे आयोजन जय युवा अकॅडमीच्या टांगेगल्ली, जुने जिल्हा न्यायालय येथील कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी ॲड.महेश शिंदे यांच्या हस्ते भिंतीपत्रकाचे प्रकाशन झाले.

याप्रसंगी विनायक नेवसे, भाऊसाहेब पादीर, मनीषा शिंदे, प्रसाद भडके, रजनीताई ताठे, कल्याणी गाडळकर, हेमलता कांबळे, रावसाहेब काळे, जयश्री शिंदे, दिपाली उदमले, ॲड.विद्या शिंदे, अनिल साळवे, दिनेश मेढे, संतोष उल्हारे, तुषार रणनवरे, बाळासाहेब पाटोळे तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सोयगावमध्ये मोकाट जनावरांचा धुमाकूळ

## मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ झाली उच्छादग्रस्त; नागरिक त्रस्त, अपघातांची मालिका सुरू

**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.२५, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** शहरातील चौकाचौकात आणि मुख्य रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वाढता संचार हा सोयगावकरांच्या डोक्याला मोठा त्रास ठरत आहे. विशेषतः बसस्टँड, शिवाजी चौक, जुना बाजार, वाल्मिकनगर, चित्रमंदिर परिसर या ठिकाणी जनावरांनी अक्षरशः कब्जा केला असून वाहतूक व्यवस्थेची दैना झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून मोकाट साडे-बैलाने गावात दहशत माजवली आहे. हा बैल बैलगाड्यांकडे झेपावत असल्यामुळे अनेकदा बैलगाड्या उलटण्याच्या घटना तोंडाशी येऊन थांबतात.

लहान मुले, वृद्ध महिला आणि नागरिक यांच्यात भितीचे सावट कायम आहे. अनेकदा जनावरे महिला व मुलांवर झडप घालत असल्याने जखमी होण्याच्या



घटना वाढल्या आहेत. वाहतूक धारकांसाठी ही परिस्थिती आणखीन धोकादायक ठरत असून मोकाट जनावरे अचानक रस्त्यावर येत असल्याने छोटे-मोठे अपघात रोजच घडत आहेत. विशेषतः मुख्य रस्त्यावर तासन्तास जनावरे बसून राहत असल्याने वाहनचालकांची मोठी कोंडी होत आहे.

आठवडे बाजार आणखीन असुरक्षित

दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या आठवडी बाजारात तर मोकाट जनावरांचा अक्षरशः ऊधम सुरू असतो. बाजारात दुकानात शिरणे, हातगाड्या पाडणे, नागरिकांना धडक देणे अशा घटना सातत्याने घडत असल्याने व्यापारी व ग्राहक यांच्यामध्ये संताप पसरला आहे. यात भर म्हणजे बाजारपेठेत आणि मुख्य रस्त्यांवर हातगाड्या व भाजी विक्रीच्या गाड्यांमुळे वाहतूक अरुंद होते. या गर्दीतच जनावरे जमा होऊन परिस्थिती अधिकच हाताबाहेर जाते.

नागरिकांची संतप्त मागणी – जनावरांना कोंडवाड्यात टाका

सोयगावकरांचे एकच मागणे – मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करा, त्यांना नोटीस द्या आणि जनावरे पकडून कोंडवाड्यात अथवा गोशाळेत जमा करा.

नगरसेवकांचा इशारा – जनावरे पकडून गोशाळेत टाकू; न मानणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

या वाढत्या समस्येकडे गंभीर दखल घेत नगरसेवक हर्षल काळे, राजू दुतोंडे, अक्षय काळे आणि संतोष बोडखे यांनी कडक भूमिका घेतली आहे. ते म्हणाले, उद्या नगरपंचायतीत सर्व नगरसेवकांची बैठक घेऊन या प्रश्नावर ठोस निर्णय घेतला जाईल. मोकाट जनावरे सोडणाऱ्या मालकांना तातडीने नोटिसा दिल्या जातील. तरीही ऐकले नाही तर जनावरे सरळ गोशाळेत किंवा कोंडवाड्यात टाकण्यात येतील. तसेच संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून दंडही आकारला जाईल. सोयगावमधील नागरिकांना आता या कारवाईकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जात आहे.

मोकाट जनावरांच्या त्रासामुळे उद्भवणारी अपघातांची मालिका आणि भीतीचे वातावरण कधी थांबणार? हे आगामी नगरपंचायतीच्या निर्णयावर अवलंबून आहे.

# थोडक्यात

## खापरखेड्यात महानिर्मितीच्या राज्यस्तरीय आंतरगृह क्रीडा स्पर्धेला प्रारंभ

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.२५, नागपूर :** महानिर्मितीच्या राज्यस्तरीय आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२७ चे यजमानपद यंदा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राला मिळाले असून स्पर्धेचे उद्घाटन २४ नोव्हेंबर सोमवारला महानिर्मितीचे (संचलन व सुव्यवस्था) २चे कार्यकारी संचालक राजेश पाटील यांच्या हस्ते वीज केंद्राच्या खापरखेडा येथील प्रकाश नगर वसाहतीतील क्रीडा मैदानावर थाटात पार पडले. महानिर्मितीच्या विविध केंद्रांमधील ४८५ खेळाडू विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होत आहे. या उद्घाटन सोहळ्याला कार्यकारी संचालक नितीन चांदुरकर, मुख्य अभियंता डॉ.अनिल कोठाये, प्रफुल भदाणे, विराज चौधरी, श्याम राठोड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर, मुख्य अभियंता गिरीश कुमरवार, उपमुख्य अभियंता नारायण राठोड, सचिन डेगवेकर, नितीन रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर क्रीडा ज्योत पेटवून मॉस्कॉटचे स्फूर्तीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्व विद्युत केंद्राच्या खेळाडूंनी शानदार मार्च पास करून मान्यवरांना मान वंदना दिली. या उत्साहाच्या क्षणी मान्यवरांच्या हस्ते हवेत रंगीबेरंगी फुगे सोडण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरुषोत्तम वारजुरकर यांनी केले. याप्रसंगी बोलताना कार्यकारी संचालक राजेश पाटील आणि नितीन चांदूरकर यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आणि पंचाच्या निर्णयाचा आदर करण्याचे मोलाचे आवाहन केले. खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता व क्रीडा स्पर्धाचे आयोजक गिरीश कुमरवार यांनी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला आंतरगृह क्रीडा स्पर्धेचे यजमानपद दिल्याबद्दल महानिर्मितीचे आभार मानले, शिवाय सर्व खेळाडूंना खेळीमेळीच्या वातावरणात खेळ खेळून या महोत्सवाचा आनंद घेण्याचे आवाहन केले. तसेच स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजन समितीच्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. स्पर्धेतील बॅडमिंटन व बुद्धिबळ या खेळांचा मोठ्या थाटात शुभारंभ करण्यात आला. यावेळी गिरीश कुमरवार, नारायण राठोड, सचिन डेगवेकर, नितीन रोकडे तसेच अधिक्षक अभियंता उपस्थित होते. कार्यक्रमाला सर्व विद्युत केंद्राचे कल्याण अधिकारी, संघ व्यवस्थापक, तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी आणि संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्याचे दुसरे मुख्यमंत्री कन्नमवारांच्या पुण्यतिथीनिमित्त पूर्णाकृती पुतळ्यास माल्यार्पण

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२५, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्याचे दुसरे मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार, समाजभूषण महाराष्ट्र भूषण यांनी प्रमाणे आपले राजकीय जीवन हे शालेय जीवनापासूनच व्यतीत केले होते. त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळामध्ये राज्याच्या विकासाचा संकल्प सिध्द केला होता. मा. सा. कन्नमवार यांनी आपले बालपण चंद्रपूर शहरातील भानापेठ प्रभागामध्ये व्यतीत केले होते. त्यांनी ज्युबिली हायस्कुल चंद्रपूर येथे आपले शिक्षण पूर्ण केले होते. त्यामुळे भानापेठ प्रभागातील नवीन पिढीला यांची माहिती व्हावी. यासाठी येथे स्मारक उभारलेले आहे. याप्रसंगी दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे दुसरे मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार यांच्या वसंत भवन परिसर जटपुरा गेट, चंद्रपूर येथील स्मारक परिसरातील पूर्णाकृती पुतळयाला पुष्पमाला अर्पण करून विदर्भ बेलदार व तत्सम समाज संघटना तसेच अखिल भारतीय विमुक्त जाती, भटक्या जमाती वेलफेअर संघ चे वतीने अभिवादन करण्यात आले. माजी मुख्यमंत्री मा.सा.कन्नमवार त्यांची राजकीय कारकीर्द चंद्रपूर शहरातून सुरू केले. आपल्या शहरामध्ये ज्यांचे जीवन व्यतीत झाले ती व्यक्ती राज्याचे मुख्यमंत्री पद भूषविते ही आम्हा शहर, जिल्हा वासियांना अत्यंत अभिमानाची बाब आहे. या प्रसंगी चंद्रशेखर कोटेवार प्रांतीय अध्यक्ष, डॉ. आनंदराव अंगलवार (एच. सी.)महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ए.आय.डी.एन.टी.वेलफेअर संघ तथा प्रांतीय कार्याध्यक्ष विदर्भ बेलदार व तत्सम जमाती समाज संघटना, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, प्रभाताई चिलके, अनिल बोरगमवार, सूर्यनारायण बत्तुलवार, मनीष कन्नमवार, चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष, आनंद कार्लेकर, आरती अंकलवार, चंद्रपूर शहर अध्यक्ष सचीन चलकलवार, अपर्णा अंगलवार, मनिषा कन्नमवार, दिपाली बंडीवार, स्वाती कत्तुरवार, कीर्ती कत्तुरवार, विशाल बत्तुलवार, निलेश मचावार, रोहित पुरमशेट्टीवार, पवन कन्नमवार, राहुल अकुलवार, सूरज पेडुलवार, रवींद्र बल्लिगवार सह बहुसंख्य पुरुष व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

## लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात पालक - शिक्षक सभा संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२५, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील दुसरी पालक-शिक्षक संघाची सभा २२ नोव्हेबर २०२५ रोजी विद्यालयाच्या सभागृहात पार पडली. या पालक-शिक्षक संघाच्या सभेचे अध्यक्षस्थानी लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे सचिव गांगेय सराफ हे होते. तर शाळेच्या मुख्याध्यापिका तथा पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षा अर्चना दुर्गपुरोहीतहोत्या. तर प्रमुख उपस्थितीत शाळेच्या पर्यवेक्षिका प्रांजली महादानी, पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा मेघा नंदबंशी, सचिव मनोज साळवे, सहसचिव रमेश चाफले यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम विद्येची देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलित करुन माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर सभेचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका प्रांजली महादानी केले. पालक - शिक्षक संघाचे सचिव मनोज साळवे यांनी या सत्रातील पहिल्या सभेत घेण्यात आलेल्या विषयाचा संपूर्ण अहवाल सभेत वाचून दाखवला. या पालक सभेत अनिल पेटकर व वंदना एंगलवार आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर पालक वर्गातुन प्राची चिचमलकर, ॲड. संदूरकर, मेघा नंदबंशी व इतर पालकांनी आपल्या पाल्यांविषयी समस्या मांडल्या.